१०-४०
२२-१२-२०२३


# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : २१/१२/२०२३

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत आज दिनांक २१/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा ते साय ५.०० वा. या वेळेत गावी (Global Alliance for Vaccines Iniciative) व नियमित लसीकरण (Routine Immunization) संदर्भात नियमित लसीकरण कार्यक्रम बळकटीकरण करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्य केंद्र स्तरावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी व सुश्रुषासंवर्ग कर्मचारी यांचेकरिता एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यशाळचे उद्घाटन मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांचे शुभहस्ते करण्यात आले, यावेळी सदर कार्यक्रमास उप आयुक्त (वैआवि) डॉ. सुभाष जाधव, एस.एम.ओ, ठाणे डॉ. किशोर चव्हाण तसेच जनसंपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे हे उपस्थित होते.

श्री. अजीज शेख मा. प्रशासक तथा मा. आयुक्त उपस्थित सर्व वैद्यकीय अधिकरी व सुश्रुषासंवर्ग कर्मचारी यांना सदर प्रशिक्षणाचा पुरेपुर फायदा घेवुन नियमित लसीकरणाचे काम १०० टक्के पुर्ण करणेबाबत सुचना दिल्या, तसेच कोवीड-१९ विषाणु आजार (नवीन JN1 व्हेरियंट) संदर्भात पुर्व तयारी नियोजन याबाबतचा आढावा घेवून उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

२१/१२/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.